# वाघ इंजिनीअरिंगच्या ३५ विद्यार्थ्यांची निवड

## कॅम्पस इंटरव्ह्युमधून मिळाली संधी

म. टा. प्रतिनिधी, नाशिक



के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात सध्या कॅम्पस इंटरव्ह्यु सुरू आहेत. या वेही अनेक नामांकित आय. टी. कंपन्यांनी विविध शाखेतील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. या वेळी मान्यवरांचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी स्वागत केले.

या कॅम्पस इंटरव्ह्युमध्ये सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना सहभाग देण्यात आला होता. सुरुवातीला प्री-प्लेसमेंट चर्चेद्वारे कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज इत्यादी माहिती देण्यात आली. या सर्व कंपनीच्या मुलाखतीमध्ये प्रथमतः ऑनलाइन टेस्ट त्यानंतर टेक्निकल टेस्टनंतर वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम करिअर डेव्हलपमेंट सेंटरमध्ये घेण्यात आली. या वेळी कॉग्निझंट, अटॉस सिंटेल, प्रिती इंजिनीअरिंग, नेटविन सिस्टीम अँड सॉफ्टवेअर आणि सीव्हीआय कार्बन आदी कंपन्यांकडून के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कम्प्युटर, आयटी, ई अँड टी. सी. आणि प्रोडक्शन इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

### शाखानिहाय निवडलेले विद्यार्थी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कम्प्युटर | ११ | आयटी | ७ | प्रॉडक्शन | ६ |
| इलेक्ट्रॉनिक्स | ४ | मेकॅनिकल | ३ | | |
| ई-अँड टीसी | ३ | इलेक्ट्रिकल | १ | | |

विद्यार्थ्यांच्या मुलाखतीनंतर आलेल्या कंपन्यांकडून एकूण ३५ विद्यार्थ्यांना साडेतीन लाखांच्यावरील पॅकेज देऊन ऑफर लेटर देण्यात आले. यात १५ मुले व २० मुलींची निवड करण्यात आली असल्याची माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. कॉलेजच्यावतीनेही विद्यार्थ्यांना मॉक इंटरव्ह्यू आणि ॲप्टिट्यूड ट्रेनिंगबाबत मार्गदर्शन करण्यात आले होते.

सकाळ

# वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ३५ विद्यार्थ्यांची कॅम्पसमध्ये निवड

पंचवटी : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात सध्या कॅम्पस इंटरव्ह्यू सुरू असून, शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत. कोग्निझंट, अटॅस सिंटेल, प्रीती इंजिनिअरिंग, नेटविन सिस्टिम अँन्ड सॉफ्टवेअर आणि सीव्हीआय कार्बन आदी कंपन्यांकडून के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, आयटी, ई अॅन्ड टीसी व प्रॉडक्शन इंजिनिअरिंगच्या ३५ विद्यार्थ्यांची निवड झाली. सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये बोलावण्यात आले होते. या सर्व कंपन्यांच्या मुलाखतींत प्रथमतः ऑनलाइन टेस्ट, त्यानंतर टेक्निकल टेस्ट व वैयक्तिक मुलाखतीची फेरी झाली. ३५ विद्यार्थांना जास्तीत जास्त ३.८ लाख आणि सरासरी दोन लाख ९१ हजारांचे पॅकेज देऊन ऑफर लेटर दिले. यात कॉम्प्युटर ११, आयटी ७, प्रॉडक्शन ६, इलेक्ट्रॉनिक्स ४, मेकॅनिकल ३, ई अॅन्ड टीसी ३, इलेक्ट्रिकल एक, अशा १५ मुले व २० मुलींचा समावेश आहे. ही माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik, Main
17/05/2019 Page No. 3

# ‘के. के. वाघ’ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड



**नाशिक ।** के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहे.

कोग्झिंट, अटॅस सिंटेल, प्रिती इंजिनिअरींग, नेटविन सिस्टीम अँण्ड सॉफ्टवेअर आणि सीव्हीआय कार्बन आदी कंपन्यांकडून इलेक्ट्रिकल मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कम्प्युटर, आयटी, ई अँन्ड टी. सी. आणि प्रोडक्शन इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी स्वागत केले. सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभाग घेतला. सुरुवातीला प्री–प्लेसमेंट चर्चेद्वारे कंपनी विषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया तसेच पॅकेज इत्यादी माहिती देण्यात आली.

महाविद्यालयातील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम करिअर डेव्हलपमेंट सेंटरमध्ये मुलाखती आणि परीक्षा पार पडल्या. ३५ विदयार्थांना ३.८ लाख आणि सरासरी २ लाख ९१ हजार पॅकेज देऊन कामावर रुजू होण्याचे पत्र देण्यात आले. निवड झालेल्यांमध्ये कम्प्युटर ११, आयटी ७, प्रोडक्शन ६, इलेक्ट्रानिक्स ४, मेकॅनिकल ३, ई. अँन्ड टी. सी. ३, इलेक्ट्रिकल १, यामध्ये १५ विद्यार्थी तसेच २० विद्यार्थिनींचा समावेश आहे, अशी माहिती ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आणि प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**Deshdoot**
**17-05-2019**

लोकमत

# कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये ३५ विद्यार्थ्यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ३५ विद्यार्थ्यांना कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. सरासरी ६० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली होती.

महाविद्यालयातील डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम करिअर डेव्हलपमेंट सेंटरमध्ये ही संपूर्ण निवडप्रक्रिया पार पडली. विद्यार्थ्यांची निवड करताना प्रथम ऑनलाइन टेस्ट व टेक्निकल टेस्ट झाल्यानंतर वैयक्तिक मुलाखती घेण्यात आल्या. या प्रक्रियेतून ३५ विद्यार्थांची निवड करण्यात आली असून, यात कॉम्प्युटर इंजिनिअरिंचे ११, आयटी ७, प्रोडक्शन ६, इलेक्ट्रानिक्स ४, मेकॅनिकल ३, ई अॅण्ड टीसी ३, इलेक्ट्रिकल १ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये १५ मुले व २० मुलींचा समावेश आहे.

Hello Nashik
Page No. 7 May 17, 2019
Powered by: erelego.com